

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/४५८ दिनांक : ०८/१०/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

**विषय : महाविद्यालयातील १८ ते २१ वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी प्राधान्याने करणे.**
**संदर्भ क्र. : मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचे अ.शा.प.क्र./निवड/कावि/४२९/२०१८, दि. २५/०९/२०१८ चे पत्र.**

महोदय/महोदया,

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी मोठया प्रमाणावर होणेच्या दुष्टीकोनातून १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी १००% होईल यासाठी प्राधान्याने कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. त्यानुसार मा. विभागीय आयुक्त पुणे यांच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये १८ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी १००% पूर्ण करणेकरिता विशेष मोहिम करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. त्यानुसार १८ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकडून मतदार नोदणीचा फॉर्म नं. ६ भरून घेण्यात यावा सदर फॉर्म सोबत वयाचा व रहिवासाचा पुरावा प्राप्त करून संपूर्ण अर्ज संबंधित ERO/AERO, उपजिल्हाधिकारी/तहसिलदार यांचेकडे जमा करणेबाबत आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील/विभागातील आपण नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यास सूचित करण्यात यावे. यासंदर्भातील कार्यवाही प्राधान्याने करावी. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

डॉ. दिपक म्हैसेकर भा.प्र.से.
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी : (का.) २६३६२२२३

अ.शा.प.क्र./निवड/कावि/ ४२८/२०१८
दिनांक : २५/९/२०१८

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ ४९६९
दिनांक - ४/१०/१८
जावक दिनांक - ५/१०/१८
विभाग -
BSD

Students' Development
Inward No.
1007
08 OCT 2018
Savitribai Phule Pune U

विषय :- विद्यापीठ व महाविद्यालयातील १८-१९ वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी प्राधान्याने करणेबाबत.

आदरणीय महोदय,

मा.मुख्य निवडणुक अधिकारी, मुंबई यांचेकडील पत्र क्र.ईएलआर२०१८/प्रक्र५७०/१८/३३ दि.३१ ऑगस्ट,२०१८ अन्वये १/१/२०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम पुणे विभागात सुरु आहे. या कार्यक्रमाअंतर्गत मी, 'मतदार यादी निरीक्षक' (Observer) म्हणून पुणे विभागातील पुणे,सातारा व सांगली जिल्हयांना भेटी दिल्या असता १८-१९ वर्षे वयोगटातील नविन मतदारांची नोंदणी विहीत प्रमाणापेक्षा खूपच अल्प प्रमाणात झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

मा.भारत निवडणुक आयोगाचे निर्देशानुसार १८ वर्षे पुर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी मोठया प्रमाणावर होणेच्या दृष्टीकोनातून आपले विद्यापीठ व अधिनस्त सर्व महाविद्यालयातील १८ वर्षे झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी १००% होईल यासाठी प्राधान्याने मोहीम स्तरावरुन कार्यवाही करावी ही विनंती.

पुणे विभागातील प्रत्येक जिल्हयात विधानसभा मतदार संघनिहाय उपजिल्हाधिकारी दर्जाचे मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यरत आहेत जिल्हाधिकारी कार्यालयास नविन मतदार नोंदणीसाठी विद्यापीठ व महाविद्यालयाचे यंत्रणा यांना नविन मतदार नोंदणीसाठीचे फॉर्म नं. ६ उपलब्ध करुन देणेच्या व सर्व आवश्यक ते सहकार्य करणेच्या सुचना यापूर्वीच देणेत आल्या आहेत. तरी त्यांचेकडून फॉर्म नं. ६ उपलब्ध करुन घेण्याबाबत आपले कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना आपले स्तरावरुन सुचना देवून १८ वर्षे पुर्ण केलेल्या मुलामुलींची मतदार नोंदणी १००% पुर्ण करणेकरीता २ ऑक्टो २०१८ रोजीच्या महात्मा गांधी यांचे जयंती दिनाचे औचित्य साधुन त्या दिवशी विशेष मोहीम सुरु करणेत यावी व १८ वर्षे पुर्ण झालेल्या मुलामूलींकडून मतदार नोदंणीचा फॉर्म नं.६ भरुन घेणेत यावा. सदर फॉर्म सोबत वयाचा व रहिवासाचा पुरावा प्राप्त करुन संपूर्ण अर्ज संबधित ERO / AERO, उपजिल्हाधिकारी / तहसिलदार यांचेकडे जमा करणेबाबत सर्व महाविद्यालयांना सुचना द्याव्यात.

कृपया सदरचा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी योग्य ते नियोजन करुन घेण्याबाबत महाविद्यालयांना आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात. विनंती,

लोकशाही सदृढ करण्यासाठी आपले सहकार्य व योगदान अंत्यत मोलाचे व उपयुक्त ठरणार आहे. तरी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

आदरपूर्वक

आपला विश्वासु
दिपक म्हैसेकर
(डॉ.दिपक म्हैसेकर)

मा.श्री.डॉ.प्रफुल्ल पवार
कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पूणे.